शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४०३ २८/११/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# दौलताबाद बाह्य वळण रस्त्यामुळे वाहतुक कोंडी सुटणार

**: खासदार चंद्रकांत खैरे**

## दौलताबाद घाट ते अब्दीमंडी पर्यंत अधिकाऱ्यांसोबत खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली पाहणी

**दौलताबाद ( ता.२८ ) :** ऐतिहासिक दौलताबाद किल्याच्या परिसरतील होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी खासदार चंद्रकांत खैरे यांनी गुरुवारी केंद्रियमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली होती. त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार आज राष्ट्रीय महामार्ग मंडळ व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, वनविभागाच्या अधिकाऱ्यांसोबत खासदार चंद्रकांत खैरे यांनी पर्यायी बाह्यवळण रस्त्याची दौलताबाद घाटापासुन अब्दीमंडी पर्यंत पाहणी केली. या रस्तासाठी नागरिकांनी विनामोबदला जमिनी देण्याचे आश्वासन स्थानिक नागरिकांनी दिल्यामुळे मार्ग अधिकच सुकर झाला असुन दौलताबादच्या बाह्य वळण रस्त्यामुळे वाहतुक कोंडीचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार असल्याची पत्रकारांशी बोलतांना खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले.

यावेळी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प व्यवस्थापक यु. जे. चांबरगोरे, अधिक्षक अभियंता व्हि. झी. गाडेकर, उपमहाप्रबंधक सुनिल पाटील, उपकार्यकारी अभियंता आर. डी. खलसे, शाखा अभियंता एस. जे. शुक्ल, एस. क्यु. कादरी, सर्व्हर राहुल पाटील, कॅड. इंजिनिअर बी. के. रेड्डी, वन विभागाचे उपवन संरक्षक हिरपुंजे, एदलवार, वनरक्षक सुलभा बोलकर, जिल्हाप्रमुख नरेंद्र त्रिवेदी, शिवाजी बनकर, शिवाजी थेटे, विश्वनाथ ढगारे, बाबासाहेब डांगे, रमेश तारापुरे, सुधीर भाले यांच्यासहगावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

राष्ट्रीय महामार्गाचे मंडळाने, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या संभाजीनगर धुळे क्र. २११ ला दौलताबाद बाह्य वळण रस्ता जोडण्याचा प्रस्ताव दिला होता. तो प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या प्रस्तावाला जोडण्यात यावा यासंबंधी केंद्रिय दळणवळणमंत्री यांची शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी गुरुवारी भेट घेऊन निवेदन दिले. या प्रस्तावाला जोडून चालु आर्थिक वर्षात समाविष्ठ करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या होत्या आणि राष्ट्रीय महामार्ग मंडळ, प्राधिकरणाला खासदार चंद्रकांत खैरे यांच्या समवेत संयुक्त पाहणीच्या सुचना दिल्या होत्या. यासंबंधी आज खासदार चंद्रकांत खैरे यांनी दौलताबाद घाट ते अब्दीमंडी पर्यंत पर्यायी वळण रस्त्याची पाहणी केली.

या रस्त्यात एक दोनच मालमत्ता येत असलेल्या शेतकऱ्यांनी ही विना मोबदला रस्त्यासाठी जमीन देण्याचे आश्वासन दौलताबादचे उपसरपंच हरुणभाई आणि सय्यद रिझवान यांनी पाहणी पथकाला दिल्याने रस्त्याचे सर्व्हेक्षण कामाला गती देण्याच्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिल्या. बहुतांश जमीन ही शासनाच्या असल्याने भुसंपादनाचा पैसा ही वाचणार आहे, शिवाय डोंगराच्या जवळून निसर्गरम्य परिसरातुन हा प्रस्तावित रस्ता जाणार आहे, त्याचा पर्यटन वृध्दीसही फायदा होईल अशी आशा खासदार चंद्रकांत खैरे यांनी यावेळी व्यक्त केली. केंद्रियमंत्री नितीन गडकरी यांच्या भेटीत त्यांनी अनेक मोठी प्रस्तावित कामे येणाऱ्या २५ डिसेंबर रोजी येडशी ते संभाजीनगर रस्त्याचा शुभारंभ संभाजीनगरात येतील त्यावेळी जाहीर करण्यात असल्याने जिल्ह्याच्या विकासासाठी मोठा हातभार असल्याने समाधानी व आशादायी चित्र असल्याचे सांगत ही कामे तीनवर्षात पूर्ण करण्यावर भर असल्याचे ही खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले. रस्ते पाहणीच्यावेळी संभाजीनगर वेरुळ या रस्त्यासाठी मंजुर ३८ कोटीच्या कामाचा आढावा घेत या कामाला गती देण्याच्या सुचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्या. दौलताबाद टी पॉंईट ते वैजापुर-येवला या रस्त्याच्या प्रस्तावात नगर नाका ते येवला असा रस्ता प्रस्तावित करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525